**कृषि विभाग महाराष्ट्र शासन**

**ई- निविदा सूचना**

**शेतकरी मासिक छपाई, संपादन-सुलभीकरण, मांडणी-सजावट**

**आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे -४११००१**

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून मराठी भाषेत प्रकाशित होणा-या मराठी शेतकरी मासिकातील लेखांचे कंपोजिंग व संपादन-सुलभीकरण, अक्षरजुळणी, मुद्रितशोधन, मांडणी-सजावट (पेजीनेशन) करणे, प्रेस कॉपी तयार करणे. विहित केलेल्या मुदतीत दर्जेदार चाररंगी ऑफसेट (हीटसेट)वेब मशीनवर छपाईसह डबल पिनींग करून मासिकाच्या मलपृष्ठावर वर्गणीदाराचा पत्ता स्टिकर पेपरवर प्रिंट करून ते पत्ते मासिकावर चिकटविणे आणि हे सर्व अंक पुणे येथील विश्रामबागवाडा पोस्ट कार्यालयात विहित कालावधीत पोहच करणे. इत्यादी अनुषंगिक कामासाठी आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-४११००१ हे ज्यांचे स्वत:चे मुद्रणालय असलेल्या सक्षम प्रकाशन संस्था/मुद्रणालय यांच्या ठेकेदारांकडून निविदा मागवित आहेत.

सदर निविदा प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राहील. वरील कामाची निविदा व निविदेच्या अटी शर्ती https://www.mahatenders.gov.in (Tender ID 2019_DOA_423464_1) या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा सूचना क्रमांक | शेमासे /निविदा-सूचना/प्रसिध्दी/२०१९-२१/ विप्र-६/ ७५ /२०१९ |
| २ | निविदा प्रसिध्दी दिनांक | दि. २६ / ०२ /२०१९ |
| ३ | निविदा डाऊनलोड सुरूवात दिनांक | दि. २६ /०२ /२०१९ सकाळी ११.०० वाजता |
| ४ | निविदा पुर्वचर्चा सभा | दि. ०२ /०३ /२०१९ दुपारी १२.०० वाजता |
| ५ | निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक | दि. ११ /०३ /२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत |
| ६ | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दि. १४ /०३ /२०१९ सकाळी ११.०० वाजता |
| ७ | निविदा पुर्वचर्चा सभा व निविदा उघडण्याचे ठिकाण | कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकूल, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे- ४११००५ |

काही कारणास्तव निविदा मंजूर करणे किंवा नाकारणे तसेच काही अपरिहार्य कारणास्तव निविदा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त कृषि यांना राहतील. निविदा फॉर्मची किंमत रू. २०,०००/- प्रती निविदा फॉर्म ( नापरतावा ) व इसारा रक्कम रू. २,००,०००/-(रू. दोन लाख फक्त) प्रती निविदा (परतावा योग्य) ऑनलाइन पध्दतीने जमा करणे अनिवार्य आहे.

स्वाक्षरीत/-

**कृषि संचालक (विप्र)**

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे